# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Website: www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादित
दि. २५.१०.२०१६
ई-मेलव्दारे

जा.क्र.१०/एनजीपी /रासेयो/माहिती/२०१६-१७/ १५४३
दिनांक : 21 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/पुणे/ नाशिक/नागपूर

विषय- रासेयो विद्यार्थी नोदणीबाबतची तसेच कार्यक्रम अधिकारी यांची २०१६-१७ ची सविंसतर माहिती पाठविणे बाबत....

संदर्भ-राज्य संपर्क अधिकारी , उच्च् व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. रासेयो २०१६/प्र.क्र.१५३/१६/ साशि-७ दि. १८.१०.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र अवलोकनार्थ सोबत जोडण्यात येत आहे. सदरहु पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपले विभागातंर्गत असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये विद्यार्थ्याकरीता राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येत असल्यास सदर विद्यार्थ्याचे नोंदणी बाबतची पत्रात नमुद/विहीत नमुन्यातील आवश्यक माहीती तसेच महाविद्यालयातील/युनिटमधील कार्यक्रम अधिकारी यांचे नांव व मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी या बाबतची माहिती एकत्रित संकलित करुन दि. २५.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यत प्रथम प्राधान्याने या संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच सदरची माहिती " निरंक" असल्यास निरंक असल्याबाबत कळविण्यात यावे.

सोबत- शासनाचे दि. १८.१०.२०१६ चे पत्र

( डॉ. सुरेश यावलकर )
प्र.सह संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/६५६५
दिनांक :- 21 OCT 2016

प्रति, प्राचार्य,
अभियांत्रिकी पदविका संस्था/तंत्रनिकेतने
औरंगाबाद विभाग

उपरोक्त पत्रान्वये मागीतलेली माहिती तात्काळ दिनांक २४/१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत प्रथम प्राधान्याने सादर करावी जेणेकरून माहिती संकलीत करून संचालनालयास वेळेत सादर करणे सुलभ होईल.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

पत्र प्राप्त झाले
20 OCT 2016
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई-१

महाराष्ट्र शासन

क्रमांक : रासेयो २०१६/प्र.क्र.१५३/१६/ साशि ७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३,महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई – ४०० ००१.
दिनांक – १८ ऑक्टोबर,२०१६.

महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. शा. २५३०६
दिनांक २०/१०/२०१६

प्रति,

मा.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
+२ स्तर/व्यवसाय शिक्षण/तंत्र शिक्षण संचालनालय

**विषय :- रासेयो विद्यार्थी नोंदणीबाबतची तसेच कार्यक्रम अधिकारी यांची २०१६-१७ ची सविस्तर माहिती पाठविण्याबाबत.**

महोदय,

आज दिनांक १८.१०.२०१६ रोजी नवी दिल्ली येथे, विद्यार्थी नोंदणीबाबतच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेत, महाराष्ट्र विद्यार्थी नोंदणीची यादी का देऊ शकत नाही, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मा.पंतप्रधान कार्यालयाने दिनांक **२५.१०.२०१६ पर्यंत** उर्वरीत विद्यार्थी नोंदणी यादी देण्याबाबत **अंतिम मुदतवाढ** दिलेली आहे. सदर यादी पाठविताना केंद्र शासनाने पाठविलेल्या पुढील विहित नमुन्यातच माहिती आवश्यक आहे.

| Serial No. | State | Name of Volunteer | College/Institution | Name of University/+२ Councils | Contact No. (Mobile) | Email id |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

सदर माहिती देताना प्रत्येक विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी असणे अनिवार्य आहे. अन्यथा ज्या विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी प्राप्त होतील, तेवढीच विद्यार्थी संख्या ग्राह्य धरली जाईल(प्राप्त विद्यार्थीसंख्येप्रमाणे सहायक अनुदान दिले जाईल) व उर्वरित वाटप केलेली विद्यार्थी संख्या रद्द होईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**सदर माहितीसोबत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील/ युनिटमधील कार्यक्रम अधिकारी यांचे नाव, मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी याबाबतची स्वतंत्र यादी पाठविणे अनिवार्य आहे.**

विद्यापीठाने पाठविलेल्या दि.१८.१०.२०१६ पर्यंतच्या प्राप्त माहितीबाबत वस्तूस्थिती पुढीलप्रमाणे-

१) पूर्ण माहिती प्राप्त झालेल्या विद्यापीठांची यादी-

| | |
|---|---|
| १ | महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |
| २ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे |
| ३ | कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक |
| ४ | महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा |
| ५ | भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे |
| ६ | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |

Inform concern dept. accordingly

२) अपूर्ण माहिती प्राप्त झालेल्या विद्यापीठांची यादी-

| अ.क्र | विद्यापीठाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | **अपूर्ण व प्राप्त यादी महाविद्यालयनिहाय नाही** |
| २ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | **रायगड जिल्हयातील काही महाविद्यालये अपूर्ण** |
| ३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | **अपूर्ण** |
| ४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | **अपूर्ण** |
| ५ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | **अपूर्ण (8 महाविद्यालये अप्राप्त)** |
| ६ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **अपूर्ण** |
| ७ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | **अपूर्ण** |
| ८ | S.N.D.T. महिला विद्यापीठ, मुंबई | **अपूर्ण** |
| ९ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | **अपूर्ण** |
| १० | गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली | **अपूर्ण** |
| ११ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | **अपूर्ण** |
| १२ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी. | **अपूर्ण** |
| १३ | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | **अपूर्ण (विद्यार्थ्यांचे मोबाईल व ई-मेल नाहीत)** |
| १४ | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली. | **अपूर्ण** |
| १५ | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | **अपूर्ण (विद्यार्थ्यांचे मोबाईल व ई-मेल नाहीत)** |

३) माहिती अप्राप्त असलेल्या विद्यापीठांची यादी-

| | |
|---|---|
| १ | संचालक, शालेय शिक्षण (+ २ स्तर) |
| २ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |
| ३ | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| ४ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |

**ज्या विद्यापीठांची माहिती प्राप्त आहे, परंतु अपूर्ण आहे (विद्यार्थी नाव / मोबाईल क्रमांक / ईमेल आयडी) अशा विद्यापीठांनी परिपूर्ण माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच विद्यापीठाने *माहिती पाठविताना, ज्या कॉलेजची माहिती जशी आली तशी पाठवून दिलेली आहे (split), अशी माहिती एकत्र संकलित करुन विद्यापीठाची एकत्रित परिपूर्ण माहिती पुनःश्च एकाच ईमेलमध्ये दिनांक २५.१०.२०१६ पर्यंत न चुकता पाठवावी.***

**उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे माहिती क्षेत्रिय कार्यालय, पुणे व या कार्यालयास पाठवावी. जर आपण माहिती पाठविली नाही व त्याबाबत मा.पंतप्रधान कार्यालयाने जर शंका उपस्थित केली, तर त्याचे उत्तर देणे विद्यापीठास बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.**

आपला

MKalal

for राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी करीता